मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# राजकारण हँडल करायला पिंपरी-चिंचवडने शिकवले

## "पब्लिक सर्विस" केंद्रबिंदू ठेवूनच कर्तव्य पालन : सनदी अधिकारी शेखर सिंह

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड शहराने राजकारण कसे ' हँडल' करायचे हे शिकवले. या भागात खूप वेगळ्या प्रकारची मते आहेत. मतभेद आहेत. परंतु, मनभेद नाहीत. शहर विकासासाठी सर्व मतप्रवाह एक होताना पाहिले आहेत. म्हणूनच "पब्लिक सर्विस" केंद्रबिंदू ठेवून काम केले. यासाठी कोणताही भेदभाव दाखविला नाही. स्वतंत्ररित्या प्रशासकीय अधिकारी म्हणून माझे काम चोख बजावले, अशा भावना पिंपरी-चिंचवडचे मावळते आयुक्त आणि नवनर्वाचित नाशिक कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केल्या.

सोसायटी फेडरेशन आणि विविध स्वयंसेवी संस्था- संघटना पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने आयुक्त शेखर सिंह यांचा नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. चिंचवड येथील ऑटो कलस्टर मध्ये रविवारी (दि .12) हा कार्यक्रम पार पडला. यावेळी आरजे श्रुती यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली.

कार्यक्रमांमध्ये भाजपा आमदार महेश लांडगे, संत साहित्याचे अभ्यासक तसेच संतपीठा संचालक डॉ. सदानंद मोरे यांच्यासह विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी व शहरातील राजकीय, सामाजिक, आरोग्य, क्रीडा, उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सोसायटी फेडरेशनचे संजीवन सांगळे, सचिन लोंढे, सुधीर देशमुख, अविरत श्रमदानचे निलेश लोंढे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे दिपक करंदिकर, विकास डोळस, डॉ. सुहास कांबळे, प्रकाश जुंकटवार, सत्या त्रिपाठी, शिवलिंग ढवळेश्वर यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच, आराध्या कुलकर्णी या चिमुकल्या विद्यार्थिनीने “मला शेखर सिहांसारखे आयुक्त व्हायचेय..” अशा आशयाचे मनोगत व्यक्त करीत उपस्थितांची दाद मिळवली.



मुलाखतीमध्ये बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये ' कोलाब्रेट स्पिरिट' खूप आहे. अनेक सेवा-संस्था या शहरासाठी अविरत झटताना दिसून येतात. सोसायटी फेडरेशन, विविध स्वयंसेवी संघटना शहर स्वच्छता, आरोग्य या मुद्द्यावर पुढे होऊन काम करत आहेत. याच माध्यमातून दिव्यांगांच्या विकासासाठी आपल्याला काम करता आले. या शहरातील लोकांनी आपल्याला भरपूर प्रेम दिले. त्यामुळे या शहरातून निरोप घेऊन पुढच्या प्रवासाला सुरुवात करणे हा माझ्यासाठी खूप भाऊक क्षण आहे.

तसेच, या शहराला राजकीय वारसा मोठा आहे. राजकारण कसे हँडल करावे या शहराने मला शिकवले. मात्र प्रशासकीय अधिकारी या नात्याने कोणताही भेदभाव न करता स्वतंत्रपणे , स्वतःच्या मतांनी शहराच्या विकासासाठी काम करायचे आहे. हेच तत्व मी जपले आणि यापुढेही आयुष्यभर हेच तत्व जपत राहणार आहे. माझ्या मनाला एखादी गोष्ट भिडली आणि ती समाज, शहर आणि नागरिकांसाठी महत्त्वाची आहे आणि तिचे दूरगामी परिणाम पुढील काळात दिसून येतील हे एकदा मनाशी पक्के केले तर मग ती पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध असतो. हेच मी पिंपरी चिंचवड शहरासाठी केले.

एसटीपी प्लांट, नदी प्रदूषण, टाऊन प्लॅनिंग यांसारख्या गोष्टी खूप चांगल्या प्रकारे पिंपरी चिंचवड शहरांमध्ये केल्या गेल्या आहेत. या अनुभवाचा चांगल्या प्रकारे वापर कुंभमेळ्यासाठी करता येणार आहे, असेही शेखर सिंह यांनी सांगितले.

### शेखर सिंह झाले भावूक...

**» आयुक्त शेखर सिंह या कार्यक्रमात भावूक झालेले पाहायला मिळाले. पुढे ते म्हणाले, “मी काय केले हे सांगत बसत नाही. शहराच्या विकासासाठी जे काही करता आले ते अतिशय चांगल्या प्रकारे केले. याचा परिणाम काही वेळा तात्काळ तर काही वेळा दूरगामी दिसून येईल. प्रशासक म्हणून काम करत असताना कोणासाठी कमी तर कोणासाठी जास्त केले असे काही वेळेला म्हटले गेले. मात्र वस्तुस्थिती तशी नाही पब्लिक सर्विस हा केंद्रबिंदू ठेवून काम केले आहे आणि ते शिस्तबद्ध करण्याचाच प्रयत्न करण्यात आलेला आहे, असे त्यांनी सांगितले.**

# दिघी गावठाण परिसरातील नागरिकांना वीज संकटातून दिलासा

## आमदार लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश; 10 MVA क्षमतेचे नवीन रोहित्र आणि स्वतंत्र वीज वाहिनी कार्यान्वित

**पिंपरी | प्रतिनीधी**

दिघी आणि परिसरातील नागरिकांना अनेक महिन्यांपासून त्रस्त करणाऱ्या वीज समस्यांवर अखेर कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे. परिसरातील झपाट्याने वाढणारी वीजेची मागणी आणि जुनी झालेली वीज वितरण यंत्रणा यामुळे दररोज ४ ते ५ तास वीज खंडित होत होती. मात्र, आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ग्रेप्स उपकेंद्र (कळस) येथे १० MVA क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र बसवण्यात आले असून, कळस उपकेंद्र ते दिघी गावठाण दरम्यान स्वतंत्र वीज वाहिनीचे कामही प्रगतीपथावर आहे.

दिघी येथील गजानन महाराज नगर, पठारे कॉलनी, भारत माता नगर, बी.यु. भंडारी, आदर्शनगर, कमलराज सोसायटी, केशर किंगडम, परांडेनगर, माऊलीनगर या परिसरात रोज सकाळी ७ ते १० या वेळेत अतिभारीमुळे वीज पुरवठा खंडित होत होता. जुन्या यंत्रणांमुळे निर्माण होणारे बिघाड आणि त्यास पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते.



या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून आमदार महेश लांडगे यांनी महावितरणच्या मुंबई कार्यालयाशी सतत संपर्क साधत ग्रेप्स उपकेंद्राची क्षमता १० MVA वरून २० MVA पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेतला.

त्यानंतर १० MVA क्षमतेचे नवीन रोहित्र कळस उपकेंद्रात पोहोचले असून, यामुळे आता वीज भाराच्या व्यवस्थापनात सक्षमपणा येणार आहे. शिवाय, दिघी परिसरासाठी स्वतंत्र वीज वाहिनीचे कामही सुरू असून, आगामी १५ दिवसांत सर्व काम पूर्ण होईल. त्यामुळे या भागातील नागरिकांना अखंडित व स्थिर वीज पुरवठा मिळणार आहे.

> “ दिघी परिसरातील नागरिक गेल्या अनेक महिन्यांपासून वीज समस्यांचा सामना करत होते. ही समस्या फक्त तात्पुरत्या उपायांनी मिटणारी नव्हती, त्यामुळे कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा निर्धार केला. कळस उपकेंद्राची क्षमता वाढवून आणि स्वतंत्र वीज वाहिनी टाकून आता दिघी परिसराला अखंड व स्थिर वीज पुरवठा होईल. महावितरण प्रशासनाने सर्व कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# पश्चिम आफ्रिकी शिष्टमंडळाची वेस्ट-टू-एनर्जी व सांडपाणी केंद्राला भेट

## महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या शाश्वत आणि पर्यावरणपूरक उपक्रमांची जागतिक स्तरावर दखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

ग्लोबल ग्रीन ग्रोथ इन्स्टिट्यूट (जीजीजीआय) यांच्या "पश्चिम आफ्रिका सिटीवाइड इन्क्लुझिव्ह सॅनिटेशन" प्रकल्पांतर्गत आणि सेंटर फॉर वॉटर अँड सॅनिटेशन तसेच सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल प्लॅनिंग अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी यांच्या सहकार्याने ज्ञानविनिमय दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत पश्चिम आफ्रिकेतील सेनेगल, बुर्किना फासो आणि कोट द आयव्हरी या देशांतील शिष्टमंडळाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती केंद्र (वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प) तसेच कॉम्बीट्रीट सांडपाणी शुद्धीकरण केंद्राला भेट दिली.

जीजीजीआय सध्या सेनेगल, बुर्किना फासो आणि कोट द आयव्हरी या देशांमध्ये "हवामान सक्षमता द्वारे सर्वसमावेशक शहरी स्वच्छता प्रोत्साहन" हा प्रकल्प राबवत आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत महापालिकेच्या यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून, स्थानिक प्रशासनांमध्ये त्या अनुभवांचा उपयोग करण्याचा हेतू या भेटीमागे होता. महापालिकेचे कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती केंद्र आणि कॉम्बीट्रीट सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प हे देशभरातील आदर्श आणि शाश्वत उपाययोजनांचे उत्कृष्ट उदाहरण मानले जातात.

या प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व मन्सूर फॉल (गेट्स फाउंडेशनचे सल्लागार) यांनी केले. त्यांच्या सोबत जेरोम फाख्री (प्रादेशिक तांत्रिक प्रमुख – सर्क्युलर इकॉनॉमी, जीजीजीआय, आफ्रिका विभाग), सिदी का (प्रमुख – तांत्रिक अभ्यास कार्यालय, स्वच्छता संचालनालय, सेनेगल), ज्युलिएन तिअंद्रेबेओगो (महासंचालक – स्वच्छता विभाग, पर्यावरण मंत्रालय, बुर्किना फासो), उस्सेनी ओउएद्राओगो (संचालक – क्षेत्रीय आकडेवारी विभाग, पर्यावरण मंत्रालय, बुर्किना फासो), अद्जुआ हेलेन ब्रागोरी एप्से योकोली (संचालक – शहरी स्वच्छता आणि निचरा विभाग, जलसंपदा मंत्रालय, कोट द आयव्हरी), डायनाबा फाये (प्रमुख – गुणवत्ता, सुरक्षा आणि पर्यावरण विभाग, राष्ट्रीय स्वच्छता कार्यालय, सेनेगल) तसेच मेरी क्रिस्टिन एमी सेंट फाये (सहयोगी – स्वच्छता विभाग, जीजीजीआय) उपस्थित होत्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांच्या अधिपत्याखाली चालू असलेल्या कचऱ्याचे व्यवस्थापन, ऊर्जा निर्मिती प्रक्रिया, सांडपाणी शुद्धीकरण तंत्रज्ञान आणि पुनर्वापर उपक्रमांबाबत तसेच मोशी येथील घनकचरा स्थानांतरण केंद्र, प्लास्टिक कचऱ्यापासून इंधन निर्मिती प्रकल्प, बांधकाम राडारोडा गोळा करून प्रक्रिया करण्याचा प्रकल्प (सी अँड डी वेस्ट प्लांट), बायो मेडिकल वेस्ट प्लांट, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी, हॉटेल वेस्ट-टू-बायोगॅस प्रकल्प, बायो मायनिंग प्रकल्प, मेकॅनिकल कंपोस्टिंग प्रकल्प आणि इतर पर्यावरणपूरक प्रकल्पांविषयी सविस्तर माहिती दिली.

या भेटीदरम्यान महापालिकेचे उपअभियंता योगेश आल्हाट, कनिष्ठ अभियंता दशरथ वाघोले, सल्लागार स्वरूप लगारे आणि प्रकल्प प्रमुख अशोक गुप्ता तसेच पर्यावरण विभागाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या दौऱ्याचे समन्वयन सीईपीटी विद्यापीठातील सेंटर फॉर वॉटर अँड सॅनिटेशन संस्थेच्या वरिष्ठ संशोधन सहयोगी ओमकार काणे आणि गौतमी सायमवार यांनी केले. प्रतिनिधीमंडळाने सर्व प्रकल्पांच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त करत महापालिकेच्या शाश्वत शहरी विकासासाठीच्या प्रयत्नांचे विशेष कौतुक केले. महापालिकेच्या पर्यावरणपूरक प्रकल्पांची आणि उपक्रमांची स्थानिक प्रशासनामध्ये अंमलबजावणी करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.




> "पिंपरी चिंचवड महापालिकेचे कचरा व्यवस्थापन, ऊर्जा निर्मिती, शून्य कचरा प्रकल्प यांसारखे विविध पर्यावरणपूरक उपक्रम जागतिक स्तरावर आदर्श ठरत आहेत. या उपक्रमांची दखल आफ्रिकी देशांनी घेतल्याने पिंपरी चिंचवड शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक उज्ज्वल झाले आहे. भविष्यातही पर्यावरण संरक्षण आणि हरित विकासाच्या वाटेवर महापालिका वाटचाल करत राहील.
>
> **– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# फक्त 12 व्या वर्षी देशातील सर्वोत्तम युवा वैज्ञानिक..!

## पिंपळे सौदागरच्या आत्मज जैन याचा भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्याकडून सन्मान

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवडमधील पिंपळे सौदागर येथील रहिवासी अवघ्या १२ वर्षांचा कु.आत्मज पराग जैन या बाल वैज्ञानिकाने विज्ञान क्षेत्रात अभिमानास्पद यश संपादन केले आहे. नुकत्याच पार पडलेल्या वर्ल्ड STEM अँड रोबोटिक्स ऑलिंपियाड (WSRO) मध्ये प्रादेशिक फेरीत यश मिळवून राष्ट्रीय स्तरावर पहिला क्रमांक पटकावला आहे. तो 'यंग सायंटिस्ट – ऑल STEM ओपन कॅटेगरी' मध्ये राष्ट्रीय विजेता ठरला आहे.

या यशामुळे आत्मजला येत्या नोव्हेंबर महिन्यात रोम (इटली) येथे होणाऱ्या फिबोनाची इंटरनॅशनल रोबोट ऑलिंपियाड (FIRO) या जागतिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. ही स्पर्धा जगभरातील तरुण नवोन्मेषकांसाठी अत्यंत प्रतिष्ठेची आणि प्रेरणादायी मानली जाते. आत्मजने भारतीय पूल संरचनांच्या आयुष्यात वाढ करून त्या अधिक सुरक्षित आणि स्मार्ट बनवण्यासाठी IOT आणि AI तंत्रज्ञानाचा वापर करून एक नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केला आहे.

देशभरातील शेकडो विद्यार्थ्यांमध्ये आत्मजने आपल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाद्वारे वैज्ञानिक विचार, संशोधन आणि तांत्रिक सर्जनशीलतेचा उत्कृष्ट नमुना सादर केला. त्याच्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण महाराष्ट्राचा अभिमान वाढला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष श्री शत्रुघ्न काटे यांनी कु.आत्मजचा शाल आणि ट्रॉफी देऊन सन्मान केला. या प्रसंगी आत्मजचे आई प्रियांका पराग जैन तसेच श्री दिपक नागरगोजे आणि स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी आपले विचार व्यक्त करीत म्हणाले की, "पिंपळे सौदागरसारख्या भागातून आत्मजसारख्या तेजस्वी विद्यार्थ्याने देशात पहिला क्रमांक मिळवणे, ही अभिमानास्पद गोष्ट आहे. १२ व्या वर्षीच त्याने संपूर्ण भारतात आपली ओळख निर्माण केली आहे. अशा मुलांमुळे आपल्या शहराचा आणि राज्याचा गौरव वाढतो. आत्मजसारखी मुले भारताच्या उज्ज्वल वैज्ञानिक भविष्याची पायाभरणी करत आहेत. त्याच्या पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो."

आत्मजच्या या यशामुळे पिंपळे सौदागर परिसरात आणि पिंपरी-चिंचवड शहरात आनंदाचे वातावरण आहे. शाळा, शिक्षक आणि नागरिकांकडून आत्मजवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, बालवयातच विज्ञानक्षेत्रात देशभर नाव कमावणारा हा कुमार भविष्यात भारताचा अभिमान ठरणार आहे.



# विविध विभागाअंतर्गत राज्य सरकारकडून महापालिकेला निधी मिळणार

## महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाचा पुनर्विकास करण्यासाठी निधीसाठीचा प्रस्ताव महापालिकेकडून राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाचा पुनर्विकास करण्यासाठी आवश्यक निधीसाठीचा प्रस्ताव महापालिकेकडून राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाचा पुनर्विकास करण्यासाठी आवश्यक निधीसाठीचा प्रस्ताव महापालिकेकडून राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. राज्य सरकारकडून विविध विभागाअंतर्गत हा निधी दिला जाणार आहे. त्यामुळे वसतिगृहाच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा होणार असला, तरीही पुनर्विकासाचे काम सुरू होण्यास आणखी बराच विलंब होण्याची शक्यता आहे.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून पुण्यात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महापालिकेने घोले रस्त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाची उभारणी केली होती.




संबंधित इमारत जीर्ण झाली आहे. तसेच संबंधित वसतिगृहातील अस्वच्छतेमुळे डेंगीची लागण होऊन, दोन विद्यार्थ्यांचा दोन वर्षांपूर्वी मृत्यू झाला होता.

या घटनेनंतर वसतिगृहातील स्वच्छतेसह पुनर्विकासाचा प्रश्न पुढे आला होता. तत्कालीन आयुक्त राजेंद्र भोसले यांनी वसतिगृहाची पाहणी करून तातडीच्या दुरुस्त्यांची कामे करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच संबंधित इमारत जुनी व जीर्ण झाल्याने वसतिगृहाच्या पुनर्विकास करण्यासंदर्भात प्रशासनास सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, महापालिका प्रशासनाने इमारतीचा विकास आराखडा तयार केला होता, त्यास इस्टिमेट कमिटीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती.

दरम्यान, वसतिगृहाचा पुनर्विकासाचे काम महापालिका व राज्य सरकार यांच्यातर्फे केले जाणार आहे. वसतिगृह उभारणीसाठी आवश्यक निधी महापालिका व राज्य सरकार खर्च करणार आहे. दरम्यान, निधीसाठीचा प्रस्ताव महापालिकेने राज्य सरकारकडे पाठविला होता. मात्र, राज्य सरकारने संबंधित प्रस्तावामध्ये त्रुटी काढून दुरुस्तीसह प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना महापालिकेस केल्या होत्या.

महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाचा पुनर्विकास करण्यासाठी आवश्यक निधीसाठीचा प्रस्ताव महापालिकेकडून राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. राज्य सरकारकडून विविध विभागाअंतर्गत हा निधी दिला जाणार आहे. त्यानुसार, महापालिकेच्या भवन विभागाकडून संबंधित त्रुटी दुरुस्त करून अद्ययावत प्रस्ताव तीन दिवसांपूर्वी राज्य सरकारकडे पाठवला आहे. राज्य सरकारच्या समाज कल्याण विभागासह अन्य विभागांमार्फत महापालिकेस वसतिगृह उभारणीसाठी निधी दिला जाणार आहे. मात्र, राज्य सरकारकडून संबंधित प्रस्ताव मंजूर होऊन व निधी महापालिकेकडे येण्यास आणखी बराच विलंब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वसतिगृहाच्या पुनर्विकासाच्या कामाला देखील विलंब होण्याची चिन्हे आहेत.

### वसतिगृह पुनर्विकासाची वैशिष्ट्ये

- वसतिगृहातील विद्यार्थी निवासाची सध्याची क्षमता : ३५०
- नवीन रचनेनुसार विद्यार्थी निवासाची क्षमता : ७००
- वसतिगृहासाठी होणारे बांधकाम : दोन लाख चौरस फूट
- तळमजल्यावरील पार्किंग व्यवस्था : पाच कार, २४८ दुचाकी
- तळमजल्यावर प्रशासन, सुरक्षा विभाग व कचरा व्यवस्थापनासाठी कार्यालये
- पहिल्या व दहाव्या मजल्यावरील व्यवस्था : भोजन कक्ष, स्वयंपाक खोल्या, अभ्यासिका, प्रथमोपचार कक्ष
- दुसऱ्या ते आठव्या मजल्यापर्यंत विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठीच्या खोल्या : १४
- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीही निवासाची स्वतंत्र व्यवस्था

> “ महापालिकेकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाचा पुनर्विकास केला जाणार आहे. मात्र त्यासाठी राज्य सरकारकडून निधी मिळणार आहे. निधी मिळण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारला पाठविला आहे. निधी प्राप्त झाल्यानंतर पुनर्विकासाच्या कामाला सुरवात होईल.
>
> - रोहिदास गव्हाणे, कार्यकारी अभियंता, भवन विभाग,

# पुणे रेल्वे विभागाची धक्कादायक आकडेवारी; नऊ महिन्यांत 301 जणांचा मृत्यू

## हिंजवडी, वाकड, बालेवाडी भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय रेल्वेच्या पुणे विभागाने जाहीर केलेल्या माहितीनुसार, फक्त नऊ महिन्यांत (जानेवारी ते सप्टेंबर २०२५) एकूण ३०१ मृत्यू नोंदवले गेले आहेत. हे मृत्यू विभागातील १०७ स्थानके, रेल्वे गाड्या आणि इतर रेल्वे परिसरात घडले आहेत, गाडीमध्ये चढताना किंवा उतरताना पडून अपघात, विद्युत करंट लागणे, आत्महत्येची प्रकरणे, प्रवासादरम्यान हृदयविकाराचा झटका येणे, ट्रॅक ओलांडताना होणारे अपघात, अशी मृत्यूची कारणे विविध आहेत, पुणे विभागातील प्रवाशांच्या सुरक्षेबाबत गंभीर स्थिती समोर आली आहे.




रेल्वे विभागाचे माहिती विभागाचे जनसंपर्क अधिकारी हेमंत कुमार बेहरा यांनी रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) कडून संकलित केलेल्या आकडेवारीच्या आधावरून याची पुष्टी केली आहे. हेमंत कुमार बेहरा यांनी बोलताना सांगितले, “आमचे आरपीएफ जवान प्रवाशांची आणि त्यांच्या सामानाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सतत जागरूक आहे. अशा घटना टाळण्यासाठी विविध उपाय राबवले जात आहेत, जानेवारी ते सप्टेंबर २०२५ दरम्यान ३०१ मृत्यू नोंदले गेले. आम्ही अनेक स्तरांवर या घटनेला आळा घालण्याचे प्रयत्न करत आहोत, तसेच प्रवाशांना सतर्क राहण्याबाबत जनजागृती करत आहोत.”

रेल्वे कार्यकर्त्यांनी सुबवले की, गर्दी असलेल्या स्थानकांवर प्लॅटफॉर्म वाढवणे, गॅप फिलर लावणे, बहुभाषिक चेतावणी चिन्हे, अतिक्रमण रोखण्यासाठी फेन्सिंग राबवणे आणि पिक ऑवर्समध्ये आरपीएफ जवानांची तैनाती करणे आवश्यक आहे. पुणे जंक्शन, शिवाजीनगर, लोणावळा आणि दौंड या ठिकाणी अपघात अधिक नोंदले जात असल्याने विशेष लक्ष द्यावे.

### वन विभागावर नाराजी

पुणे विभाग हा दौड, मिरज, कोल्हापूर आणि सातारा या विस्तृत रेल्वे नेटवर्कचा भाग असून दररोज हजारो प्रवासी याचा वापर करतात, गाड्यांची संख्या, गर्दी आणि धोकादायक प्रवासी वर्तनामुळे रेल्वे प्रवास अनेकांसाठी धोकादायक ठरत आहे, प्रवासी संघटना आणि नियमित प्रवाशांनी तातडीने “सुरक्षा उपाययोजना” राबवण्याची मागणी केली आहे. एका स्थानिक प्रवासी संघटनेच्या प्रतिनिधीनुसार, “नऊ महिन्यांत ३०१ लोक मृत्युमुखी पडले, हे केवळ आकडे नाही. हे प्रणालीगत अपयश आहे. प्लॅटफॉर्म गाडीचा मैप कमी करणे, चेतावणी यंत्रणा, तातडीची प्रतिसाद युनिट्स आणि सुरक्षा देखरेख वाढवणे आवश्यक आहे.”

# आंबेगावमधील बिबट्यांचा उपद्रव थांबणार? नसबंदी कायद्यासाठी वळसे पाटलांचा पाठपुरावा

## राज्य सरकारने यासंबंधीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला असून तो मंजूर करून घेण्यासाठी आपला पाठपुरावा सुरु आहे,

**पुणे | प्रतिनिधी**

बिबट्याच्या वाढत्या उपद्रवामुळे निर्माण झालेल्या समस्येवर शाश्वत उपाययोजना म्हणून बिबट्या नसबंदी कायदा आणण्यासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. सध्याच्या कायद्यामध्ये बिबट्यांची नसबंदी करण्याची तरतूद नाही.त्यामुळे राज्य सरकारने यासंबंधीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला असून तो मंजूर करून घेण्यासाठी आपला पाठपुरावा सुरू आहे,अशी माहिती माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी रविवार, दि. १२ रोजी दिली.पिंपरखेड (ता. शिरूर) येथील बालिका शिवन्या बोंबे हिच्यावर बिबट्याने हल्ला केल्यामुळे तिचे निधन झाले.

मंचर उपजिल्हा रुग्णालयात तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी आणला असता तेथे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी भेट दिली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील म्हणाले, बिबट्याच्या विषयावर तातडीने बैठक घेऊन मार्ग काढण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी देखील चर्चा करण्यात आली आहे.उत्तर पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये बिबट्या-मानवी संघर्षामुळे भीतीचे आणि दहशतीचे वातावरण आहे.शेतकरी आणि त्यांच्या पशुधनावर होणारे हल्ले ही अत्यंत गंभीर बाब आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाच्या स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.

बिबट्याच्या वाढत्या उपद्रवामुळे निर्माण झालेल्या समस्येवर शाश्वत उपाययोजना म्हणून बिबट्या नसबंदी कायदा आणण्यासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. सध्याच्या कायद्यामध्ये बिबट्यांची नसबंदी करण्याची तरतूद नाही.त्यामुळे राज्य सरकारने यासंबंधीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला असून तो मंजूर करून घेण्यासाठी आपला पाठपुरावा सुरू आहे या पार्श्वभूमीवर, मलठण येथे एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी सुरक्षेसाठी आणि बिबट्या पकडण्यासाठी आवश्यक असलेल्या पिंजऱ्यांच्या व्यवस्थेकरिता तातडीने दोन कोटी रुपये उपलब्ध करून देण्याची घोषणा अजित पवार यांनी केली. यामध्ये सुमारे २०० पिंजऱ्यांची व्यवस्था केली जाईल, तसेच, वन विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने खबरदारीच्या उपाययोजना लागू करण्याचे सक्त निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती दिलीप वळसे पाटील यांनी दिली.



### ग्रामस्थांची मागणी

» जांभोरी गावच्या लोकनियुक्त सरपंच सुनंदा पारधी, उपसरपंच बबन केंगले, पोलिस पाटील नवनाथ केंगले, मारुती केंगले, सोनाली पोटे, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल पारधी, रवी भवारी, शिवराम केंगले यांच्यासह ग्रामस्थांनी बिबट्याच्या हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याची मागणी केली आहे. तसेच, कैलास काळे, सावता झोडगे, विनायक काळे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन बिबट्याचा बंदोबस्त करावा आणि नागरिक व जनावरांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

### वन विभागावर नाराजी

» बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे आणि नागरी वस्त्यांमधील त्यांच्या मुक्त संचारामुळे आंबेगाव तालुक्यातील पश्चिम भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. वन विभागाकडून ठोस कारवाई न झाल्यास ग्रामस्थांच्या नाराजीचा उद्रेक होण्याची शक्यता आहे.

### वन विभागाची कारवाई कधी?

» बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे आणि नागरी वस्त्यांमधील त्यांच्या मुक्त संचारामुळे आंबेगाव तालुक्यातील पश्चिम भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. वन विभागाकडून ठोस कारवाई न झाल्यास ग्रामस्थांच्या नाराजीचा उद्रेक होण्याची शक्यता आहे.

---

# नको हा रेल्वे प्रकल्प! खेड तालुक्यातील शेतकऱ्यांचा आक्रोश ; खासदार कोल्हे, आमदार काळे यांचा पाठिंबा

## शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी शेतकऱ्यांच्या सोबत राहण्याची ठाम भूमिका घेतली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे ते उरुळी कांचन या प्रस्तावित रेल्वेमार्गाला स्थानिक शेतकरी आणि नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला असून, या प्रकल्पामुळे शेतजमिनी आणि घरांच्या मालकांना मोठे नुकसान सहन करावे लागणार असल्याची भीती व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी शेतकऱ्यांच्या सोबत राहण्याची ठाम भूमिका घेतली आहे. कुरूळी (ता. खेड) येथे तळेगाव-उरुळी कांचन रेल्वे प्रकल्पाच्या विरोधात आयोजित आंदोलनात नागरिकांसोबत लोकप्रतिनिधीही सहभागी झाले. या वेळी खासदार डॉ.अमोल कोल्हे आणि आमदार बाबाजी काळे यांनी कुरूळीसह 12 गावांतील प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे मार्गदर्शन केले. स्थानिकांनी या मार्गाचा डीपीआर रद्द करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडे केली. या मार्गामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतांवर, घरांवर आणि शेतीमार्गांवर थेट परिणाम होणार असून, शेतकऱ्यांना जमिनीच्या नुकसानीसोबतच उपजीविकेचा प्रश्न निर्माण होईल, अशी चिंता व्यक्त करण्यात आली.

स्थानिक शेतकऱ्यांनी यावेळी सांगितले की, यापूर्वीच शासनाने या भागातील मोठ्या प्रमाणात जमिनी एमआयडीसी, रिंगरोड आणि पुणे-नाशिक महामार्ग यांसारख्या प्रकल्पांसाठी संपादित केल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांकडे आता केवळ अत्यल्प शेती जमीन शिल्लक असून, तीच त्यांच्या उपजीविकेचा एकमेव आधार आहे. या आंदोलनामुळे रेल्वे प्रकल्पाबाबत प्रशासनासमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, स्थानिक स्तरावर या विषयावर तीव्र चर्चा सुरू आहे.



> “शेतकऱ्यांच्या बाजूने ठाम राहण्याची आमची भूमिका आहे. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे जगणे उद्ध्वस्त होईल. आम्ही या लढ्यात शेतकऱ्यांसोबत आहोत आणि त्यांचे हक्क वाचवण्यासाठी पुढे राहून लढा देऊ.”
>
> \- बाबाजी काळे. आमदार खेड आळंदी

> “या भागातील जनतेच्या आणि शेतकऱ्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी मी स्वतः घेतली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील.”
>
> \- डॉ. अमोल कोल्हे, खासदार शिरूर